# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर.

(शिक्षण विभाग)

जा.क्र.4795/शि.वि./२०१५ दि.02/०९/२०१५

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य.शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय : आपल्या शाळेतील मागील ३ वर्षात सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना "शिक्षक दिन" सोहळयात सन्मानित करण्याबाबत.**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, दि.०५ सप्टेंबर, २०१५ रोजी "शिक्षक दिन" निमित्त नागपूर महानगरपालिकेतर्फे शिक्षक दिन समारोह आयोजित करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमात सत्र २०१३-१४, २०१४-१५ व २०१५-१६ या वर्षात सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक/शिक्षिकांचा सन्मान करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम सकाळी ९.३० वाजता शिक्षक सहकारी बॅंक सभागृह, शुक्रवारी तलाव, महाल, नागपूर येथे होणार आहे.

आपल्या शाळेत उपरोक्त ३ वर्षात सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक/शिक्षिकांना आपल्या स्तरावर सुचना देवून त्यांना उपरोक्त कार्यक्रमात उपस्थित राहण्याबाबत आवर्जुन सुचित करावे. तसा कार्यपालन अहवाल कार्यालयास सादर करावा व सर्व मु.अ., शिक्षकांनी कार्यक्रमास वेळेवर उपस्थित राहावे.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर.